57

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ● 2014 ● LR 942453

दिनांक वि.नं. ... ला.नं.१९/१६

श्री ... विभागीय संचालक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ...

रु.(१००) चा स्टँप मागितलेवरून रु. १००/-ची

त्यांचे भरती रू. ... असे स्टँप दिले - 2 FEB 2015

राहुल ना. पाटील
स्टँप व्हेंडर

STAMP HEAD CLERK,
TREASURY OFFICE,
KOLHAPUR (M.S.)

सामंजस्य करारनामा

(Memorandum of Understanding)

सदरचा सामंजस्य करारनामा आज दि. ५ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूर येथे, लिहुन देणार निम्न लिखीत प्रथम क्रमांकावर उल्लेखीत संस्था व करारनामा लिहुन घेणार द्वितीय क्रमांकावर उल्लेखीत संस्था याचे दरम्यान स्वयंअध्ययन साहित्याचे (Self Instructional Material Adaption) वापर, व या करारनाम्यात उल्लेख केलेल्या अधिकारासंबंधी,करण्यात आला.

करारनामा लिहुन देणार

कुलगुरू
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
गोवर्धन, नाशिक – ४२२ २२२ पार्टी नं. १

करारनामा लिहुन घेणार

कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर. पार्टी नं. २

1. करारनामा लिहुन देणार पार्टी नं. १ हे महाराष्ट्र शासन कायदा क्रमांक xx of 1989 द्वारे स्थापित झालेले, महाराष्ट्रात मुक्त व दूर शिक्षणाद्वारे वंचितापर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी स्थापन झालेले महाराष्ट्र व त्याबाहेरचे कार्यक्षेत्र असलेले स्वायत्त विद्यापीठ आहे.
2. करारनामा लिहुन घेणार पार्टी नं. २ महाराष्ट्र शासन, शिवाजी विद्यापीठ अधिनियम १९६२ द्वारे स्थापित झालेले आणि सध्या कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयाचे कार्यक्षेत्र असलेले स्वायत्त विद्यापीठ आहे.
3. करारानामा लिहुन देणार पार्टी नं. १ यांना महाराष्ट्रभरात विद्यार्थ्यांना बी.ए./बी.कॉम. भाग २ पर्यावरणशास्त्र आणि एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी), एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) या पदव्युत्तर शिक्षणक्रमांचे स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून द्यावयाचे आहे. संबंधित स्वयंअध्ययन साहित्य करारनामा लिहुन घेणार पार्टी नं. २ यांच्या दूर शिक्षण विभागाने विकसित करून त्यांच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध करून दिले आहे. ते मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याकरिता करारनामा लिहुन देणारा हे करारनामा लिहुन घेणारा यांच्या यासंबंधित अधिकार मंडळाला Approach झाले व तशी स्वारस्य अभिव्यक्ती सादर केली आहे.
4. सदर स्वारस्य अभिव्यक्तीनुसार करारनामा लिहुन देणार आणि करारनामा लिहुन घेणार यांच्यात परस्पर अटी, शर्ती, वापर, मुद्रण, पुर्नमुद्रण, स्वामित्व हक्क, स्वामित्व धन या विषयी चर्चा होऊन पुढीलप्रमाणे परस्पर सामंजस्य करार आज रोजी दि. 17 FEB 2015 कोल्हापूर मुक्कामी करण्यात आला.
5. यातील पार्टी नं. २ यांनी पार्टी नं. १ यांना प्राप्त स्वारस्य अभिव्यक्तीनुसार पार्टी नं. २ यांनी दूर शिक्षणासाठी विकसित केलेले पदव्युत्तर स्तरावरील एम.ए.,(मराठी, हिंदी, इंग्रजी),एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) या शिक्षणक्रमांचे (शैक्षणिक वर्ष २०१०–११Annual Pattern) स्वयंअध्ययन साहित्य तसेच बी.ए./बी.कॉम. भाग – २ चे पर्यावरण शास्त्राचे स्वयंअध्ययन साहित्य पुढील अटी व शर्तींना अधिन राहून उपलब्ध करून द्यावयाचे आहे.
6. स्वयंअध्ययन साहित्य (SIM) देण्यापुर्वी पार्टी नं. १ यांनी या अध्ययन साहित्यावर छापावयाचे मुखपृष्ठ तयार करून ते पार्टी नं. २ यांना देण्याचे आहे. यात पुढील बाबींचा समावेश असेल.
   अ. मुखपृष्ठावर वरच्या भागात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक असा उल्लेख, त्यांचा लोगो, शिक्षणक्रमाचे नांव, शिक्षणक्रम संकेतांक इ. सर्व माहिती मुक्त विद्यापीठाच्या पॅटर्नप्रमाणे असावी.

   आ. मुखपृष्ठावर खालच्या भागात सदरचे स्वयंअध्ययन साहित्य हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी विकसित केले आहे, असा स्पष्ट उल्लेख असावा.

   इ. मुखपृष्ठाच्या आतील पानावर, सदर स्वयंअध्ययन साहित्याचे लेखक, शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण केंद्राची निर्मिती, छपाई वर्ष, ISBN क्रमांक इ. माहिती व मुक्त विद्यापीठाची निर्मिती प्रक्रियेची आवश्यक माहिती द्यावी. याच पृष्ठावर याचा स्वामित्व हक्क शिवाजी विद्यापीठाकडे असून त्यांचे परवानगी शिवाय यातील कुठल्याही भागाचा वापर, पुर्नमुद्रण करता येणार नाही असा स्पष्ट उल्लेख असावा.

ई. सदर स्वयंअध्ययन साहित्याचा वापर (Adapt) करताना त्यांची रचना ही मुक्त विद्यापीठाच्या इतर शिक्षणक्रमांच्या पाठयपुस्तकांच्या रचनेनुसार करून घेण्यात येईल व यासाठी आवश्यक बदल करून घेण्याचा अधिकार करारनामा लिहून देणार यांना राहील. याबाबतची माहिती पार्टी नं. १ ने पार्टी नं. २ यांना देणे आवश्यक आहे.

7. करारानुसार पार्टी नं. २ यांनी पार्टी नं. १ यांना दूर शिक्षण केंद्रा अंतर्गत विकसित केलेले पदव्युत्तर स्तरावरील एम.ए.,(मराठी, हिंदी, इंग्रजी),एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) या शिक्षणक्रमांचे (शैक्षणिक वर्ष २०१०–११ Annual Pattern) स्वयंअध्ययन साहित्य तसेच बी.ए./बी.कॉम. भाग –२ चे पर्यावरणशास्त्राचे स्वयंअध्ययन साहित्याची Soft Copy देणेचे आहे. पाटी नं. १ यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार स्वयंअध्ययन साहित्य छपाई करून घेणेचे आहे.

8. पार्टी नं. १ यांनी छपाई करून घेतलेल्या संख्यावरून शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार (Annexure - 1) स्वयंअध्ययन साहित्य वापरण्यापोटी २० टक्के स्वामित्व शुल्क देणेचे आहे. पार्टी नं. १ यांनी व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार ठरलेले २० टक्के स्वामित्व शुल्काची एकूण रक्कम पार्टी नं. २ यांनी सूचित केलेल्या बॅंक खात्यावर भरणेची आहे. स्वयंअध्ययन साहित्याची छपाई पूर्ण झाल्यावर त्याचा अहवाल (छपाई केलेल्या स्वयंअध्ययन संख्यासह) पार्टी नं. १ यांनी पार्टी नं. २ यांना देणेचा आहे. त्याअनुषंगाने पार्टी नं. १ यांनी छपाई केलेले साहित्याचे स्वामित्व शुल्कांची एकूण रक्कम दोन महिन्यांमध्ये जमा करणेची आहे. वर्षअखेरीस पार्टी नं. १ यांनी सदरच्या स्वयंअध्ययन साहित्याची छपाई Audited Account Copy पार्टी नं. २ यांना देणेची आहे.

9. सदर सामंजस्य कराराचा कालावधी सुरूवातीला ५ वर्ष राहील व त्यानंतर परस्पर सामंजस्याने व ठरलेल्या अटी व शर्ती अनुसार पुढे तो वाढवता येईल.

10. प्रस्तावित स्वयंअध्ययन साहित्य हस्तांतरण व पुढील सर्व प्रक्रियेसाठी दोन्ही विद्यापीठांनी समन्वय साधण्यासाठी एक एक याप्रमाणे दोन नोडल ऑफीसर्स नियुक्त करावयाचे आहेत व त्यांच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करणेची आहे.

11. स्वयंअध्ययन साहित्य पडताळणी (अभ्यासक्रम व्यतिरिक्त), दुरूस्ती, त्रुटी सुधारणा व यावरचा अंतिम निर्णयासाठी पार्टी नं. १ यांनी समिती स्थापन करावी. सदर समितीने अध्ययन साहित्यांची उच्च गुणवत्ता राखण्यासाठी त्या त्या विषयातील विषय तज्ञांची नेमणूक करून योग्य दुरूस्त्या, सुधारणा करून घ्याव्यात. याबाबतचे अंतिम अधिकार या समितीला असेल व झालेल्या बदलांची माहिती पार्टी नं. २ ला कळवावी. सदर दुरूस्त्या या शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या अधिकारावर कोणतेही अतिक्रमण न होता समितीने दुरूस्त्या सुचवेल व त्या समितीने सुचविलेल्या दुरूस्त्या विचारात घेवून त्यामधील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त व शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या कोणत्याही अधिकाराला बाधा न येता दुरूस्त्या करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

12. सदरचा सामंजस्य करार हा सुरूवातीला पदव्युत्तर स्तरावरील एम.ए.,(मराठी,हिंदी,इंग्रजी), एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) या शिक्षणक्रमांचे (शैक्षणिक वर्ष २०१०–११ Annual Pattern) स्वयंअध्ययन साहित्य तसेच बी.ए./बी.कॉम. भाग – २ चे पर्यावरणशास्त्र यासाठी २०१५–१६ शैक्षणिक वर्षापासून लागू होईल.

13. स्वयंअध्ययन साहित्याबाबत कॉपीराईटचे हक्क हे पार्टी नं. २ यांचे राहतील. सदर सामंजस्य करारनामा यात जर बदल करावायाचे असेल तर ते दोन्ही पार्टींच्या संमतीनेच करणेचे आहे.
14. सदर करारासंबंधी काही वाद उद्भवल्यास तो दोन्ही पार्टींनी सामंजस्याने मिटविण्याचा आहे. न्याय तंटयाबाबत ज्युरिस्डीक्शन कोल्हापूर न्यायालय राहील.
15. दोन्ही पार्टींपैकी कोणत्याही पार्टीस सदरचा करार रद्द करावयाचा असल्यास तीन महिने आगाऊ नोटीस देवून करार रद्द करू शकेल. परंतु त्यास सुरू असलेल्या शैक्षणिक वर्ष व स्वयंअध्ययन साहित्य केलेल्या मागणीस बाधा न येता पुढील शैक्षणिक वर्षापासून ते अंमलात येईल.

**करारनामा लिहून देणार**

कुलगुरू
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक

**साक्षीदार**
०१) ..................................
०२) ..................................

**करारनामा लिहून घेणार**

7/1/2015
कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

SHIVAJI UNIVERSITY शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. KOLHAPUR.

**कुलगुरू**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**साक्षीदार**
०१) ..................................
०२) ..................................

Annexure-I (3 pages)

**Management Council**
**22nd January, 2015**

विषय क्र. ३१ - दूर शिक्षण केंद्रांतर्गत पदव्युत्तर स्तरावरील एम.ए. भाषा (वार्षिक पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) व एम.एस्सी. गणित (सत्र पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) या विषयाचे स्वयंअध्ययन साहित्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे स्वीकार (Adapt) करू इच्छित आहेत. त्याबाबत मा.कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची दि.१८.११.२०१४ व दि.३१.१२.२०१४ रोजीचे पत्रे व त्याअनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत विचारार्थ.

(सोबत समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत जोडला आहे.)

(टिपणी : दूर शिक्षण केंद्रांतर्गत पदव्युत्तर स्तरावरील एम.ए.भाषा (वार्षिक पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) व एम.एस्सी. गणित (सत्र पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) स्वयंअध्ययन साहित्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे स्वीकार (Adapt) करू इच्छित आहेत. याबाबत मा.कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी दि.१८.११.२०१४ नुसार शिवाजी विद्यापीठाने मुक्त विद्यापीठास सहकार्य करावे असे कळविले आहे.

सदर पत्रावर कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के - अध्यक्ष
२) संचालक, दूर शिक्षण केंद्र - सदस्य
३) विभागीय संचालक, कोल्हापूर विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - सदस्य.

सदर समितीची बैठक दि.०७/०१/२०१५ रोजी झाली व त्याचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे.

सदर कार्यवृत्तांतानुसार विद्यापीठ मुद्रणालयाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या मागणीप्रमाणे स्वयंअध्ययन साहित्याची छपाई करण्याबाबत होकार कळविलेला आहे. याबाबत मा.कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या पत्रानुसार व समितीच्या कार्यवृत्तांनुसार खालील बाबी विचार होणे गरजेचे आहे.

१. शिवाजी विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास तत्वत: मान्यता.
२. या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीच्या दि.०७/०१/२०१५ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास मान्यता.
३. विद्यापीठ मुद्रणालयाने, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या मागणीप्रमाणे स्वयंअध्ययन साहित्याची छपाई करण्याबाबत होकार दर्शविलेने त्याबाबत स्वामित्व शुल्क निश्चित होणे.

सबब, दूर शिक्षण केंद्रांतर्गत पदव्युत्तर स्तरावरील एम.ए.भाषा (वार्षिक पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) व एम.एस्सी. गणित (सत्र पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) या विषयांचे साहित्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे स्वीकार (Adapt) करू इच्छित आहेत. त्याबाबत मा.कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची दि.१८.११.२०१४ व दि.३१.१२.२०१४ रोजीचे पत्रे व त्याअनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत विचारार्थ.)

**ठराव : अ) दूर शिक्षण केंद्रांतर्गत पदव्युत्तर स्तरावरील एम.ए. भाषा (वार्षिक पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) व एम.एस्सी. गणित (सत्र पध्दती २०१० चा अभ्यासक्रम) या विषयांचे स्वयंअध्ययन साहित्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना स्वीकार (Adapt) करण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) स्वयंअध्ययन साहित्य छपाई वापरण्यापोटी २० टक्के स्वामित्व शुल्क घेण्यास मान्यता देण्यात आली.**